From the house of
HOME CABLE
HOME NET

# होम टाइम्स

मराठी

साप्ताहिक शनिवार

FREE COPY

RNI No.: MAHMAR/2016/66872 | Post Reg. No. MNE/374/2019-21 | Volume IX | Issue 27 | Saturday, 30th Sept 2023 to 6th Oct 2023 | Price ~~Rs 3/-~~

www.hometimes.in | www.facebook.com/hometimes.in | www.twitter.com/hometimes_news | hometimes.in | write2us@hometimes.in

**गणपती गेले गावाला ...**

# गणेश भक्तांनी साश्रू नयनांनी दिला बाप्पाला निरोप




■ होम टाइम्स टीम

'ढोल ताशांचा गजर, फटाक्यांची आतिषबाजी आणि भक्तांचा उसळलेला महासागर अशा वातावरणात गणेशोस्तवाची गुरुवारी सांगता झाली. गुलाल उधळत, पुढच्या वर्षी तू लवकर या अशा घोषणा देत मुंबईसह देशभरात गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. गेले दहा दिवस भक्तांनी मनोभावे पूजा अर्चा करून गणेशाची सेवा केली होती. शेवटच्या दिवशी साश्रू नयनांनी गणेशभक्तांनी त्यांच्या लाडक्या बाप्पाला निरोप दिला.

मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्र आणि देशभरात मोठ्या श्रद्धेने आणि भक्तीभावाने साजरा होणाऱ्या १० दिवसीय गणेश उत्सवाच्या शेवटच्या दिवशी ढोल ताशाच्या गजरात गणपती बाप्पाचे विसर्जन करण्यात आले. विसर्जनाच्या वेळी गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषात भाविक बाप्पाला निरोप देताना दिसत होते. (पान ३,४,५ वर)




Lions International
LEO CLUB OF GHATKOPAR
Leo Multiple 3231 | Leo District 3231 A2 | ZONE 2| LY 2023-24 | Mumbai
Sponsored by : Lions Club of Ghatkopar
GARBA Battle
GARBA FOR A CAUSE OF CHILDHOOD CANCER
AGE GROUP
BELOW 18 YEARS
18-30 YEARS | 30+ YEARS
SEPTEMBER
30
6PM ONWARDS
REGISTRATION FEES
300/- PER PERSON
10% OFF MIN.10 PPL
15% OFF MIN.20 PPL
VENUE : INTERLINK BANQUETS, VIDYAVIHAR
SCAN TO REGISTER
HAMPERS WORTH 2000/- & MORE
FREE RAASRANG SEASON PASSES
TROPHY, VOUCHERS, CERTIFICATES
PARTICIPANTS WILL BE APPRECIATED TOO
SCAN TO PAY
ON THE SPOT REGISTRATION AVAILABLE
90823 06472 | 99875 19724 | 81693 91099
NON STOP GARBA ON DJ | FOOD STALLS AVAILABLE ON PAY BASIS
JVM SPACES
a mehta group venture
TITLE SPONSOR
INFANT & KIDS PARTNER
Alaana
SKIN CARE PARTNER
JEWELLERY PARTNER
RELY NATUROPATHY
NATUROPATHY PARTNER
NEXUS
HOME AUTOMATION PARTNER
FASHION PARTNER
VERGENA
LINGERIE & NIGHTWEAR PARTNER
REFFLECTION
SALON PARTNER
DESIGNING PARTNER
GIFTING PARTNER
VOG
વોઇસ ઓફ ઘાટકોપર
MEDIA PARTNER
HOMEDECOR PARTNER
Smile Charities
CHARITY PARTNER
FoodSpot
FOOD PARTNER
MEPASS
TICKETING PARTNER
BISTRO & CAFE PARTNER
Sakhiyaari
COMMUNITY PARTNER
The Fitbee
FITNESS PARTNER

# गणेश भक्तांनी साश्रू नयनांनी दिला बाप्पाला निरोप







भोईर तलाव

मुलुंडमध्ये बांधण्यात आलेल्या कृत्रिम तलावात बाप्पाच्या विसर्जनापूर्वी भक्तगण त्यांची आरती करताना दिसले. यावेळी लहान मुलांमध्येही उत्साह दिसून येत होता. मुलुंड टी वॉर्डने दिलेल्या माहितीनुसार, दीड दिवसाच्या विसर्जनात मुलुंडमधील एकूण ३६७२ मूर्तींचे विसर्जन करण्यात आले.

मुलुंडच्या मोरया तलावात १ हजार ३५१ मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. तर, पूर्वेकडील गणेश घाट तलावात ५४३ गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले आहे. मुलुंड पूर्वेकडील हरिओम नगर येथील भोईर तलावात २०४ मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. मुलुंड पश्चिमेकडील स्वप्ननगरी येथील कृत्रिम तलावात ७४७ मूर्तींचे विसर्जन करण्यात आले, तर कालिदास येथील कृत्रिम तलावात ४२२ विघ्नहर्ता मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. मुलुंड पूर्व येथील वीर सावरकर कृत्रिम तलावात बाप्पांच्या ३०० मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. पश्चिमेकडील बारकू पाटील मैदानावर असलेल्या कृत्रिम तलावात एकूण १०४ गणपती बाप्पांच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले आहे.




मोरया तलाव

# गणेश भक्तांनी साश्रू नयनांनी दिला बाप्पाला निरोप







*५ व्या दिवशी* मुलुंडच्या मोरिया तलावात घरगुती गणपतीच्या १,२२५ मूर्ती, ८६ गौरी आणि ३१ सार्वजनिक गणेश मंडळांच्या गणपतींचे विसर्जन करण्यात आले, तर मुलुंडच्या मिठागर तलावात १२ सार्वजनिक गणेश मूर्ती, ४६ देवीच्या मूर्ती आणि ५४ देवीच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. मुलुंड पूर्व येथील वीर सावरकर कृत्रिम तलावात २६२ घरगुती, ४२ गौरी आणि २ सार्वजनिक गणेश मंडळांच्या बाप्पाच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. यासोबतच हरी ओम नगर येथील भोईर तलावात १९५ घरगुती मूर्ती, सार्वजनिक मंडपातील एक मूर्ती आणि २१ गौरी गणपतींचे विसर्जन करण्यात आले. मुलुंड पश्चिम स्वप्न नगरी येथे तयार करण्यात आलेल्या कृत्रिम तलावात पाचव्या दिवसापर्यंत ३० गौरी मूर्ती, १३ सार्वजनिक मूर्ती आणि ६९६ घरगुती गणपतींचे विसर्जन करण्यात आले.

कालिदास येथील कृत्रिम तलावात २९१ घरगुती, १३ गौरी आणि ५ सार्वजनिक गणेश मंडळांचे विसर्जन करण्यात आले. मुलुंड एसीसी रोडवरील बारकू पाटील उद्यान कृत्रिम तलावात १२३ घरगुती आणि १६ गौरी मूर्ती आणि सार्वजनिक मंडळातील एका मूर्तीचे विसर्जन करण्यात आले.



*सातव्या दिवशी* मुलुंड पूर्वेला असलेल्या मोरया तलावात २५७ घरगुती, तर ३३ सार्वजनिक गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. याशिवाय २३ घरगुती मूर्ती आणि ३ सार्वजनिक गणेशमूर्तींचे मिठागर तलावात विसर्जन करण्यात आले. मुलुंड पूर्व येथील भोईर तलावात १५ घरगुती मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. तर स्वप्न नगरी तलावात १५३ घरगुती मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. सार्वजनिक गणेश मंडळातील तीन मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. मुलुंड पश्चिम कालिदास येथे तयार करण्यात आलेल्या कृत्रिम तलावात ३७ घरगुती मूर्ती आणि दोन सार्वजनिक गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. एवढेच नाही तर एसीसी रोडवर बांधण्यात आलेल्या कृत्रिम तलावात २३ घरगुती मूर्ती आणि एका सार्वजनिक गणेशमूर्तीचे विसर्जन करण्यात आले. वीर सावरकर येथील कृत्रिम तलावात १३ घरगुती मूर्तींचे विसर्जन करण्यात आले.

*गणेश उत्सवाच्या शेवटच्या दिवशी म्हणजे दहाव्या दिवशी मुलुंडच्या मोरया तलावात सार्वजनिक गणेश मंडळातील १९१ मूर्ती आणि ७०४ घरगुती मूर्तींचे विसर्जन करण्यात आले, तर मिठागर येथे ८ घरगुती मूर्ती आणि सार्वजनिक गणेश मंडळांच्या ९८ गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. याशिवाय भोईर तलावात ६ घरगुती मूर्ती आणि सार्वजनिक गणेश मंडळांच्या ८४ मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. हेच दृश्य वीर सावरकर कृत्रिम तलावात दिसले. जेथे एकूण ६० मूर्तींचे विसर्जन करण्यात आले, ज्यामध्ये ५९ घरगुती मूर्तींचा समावेश होता. मुलुंड पश्चिम कालिदास येथे तयार केलेल्या कृत्रिम तलावात ९६ घरगुती मूर्तींचे विसर्जन करण्यात आले आणि १ सार्वजनिक गणेश मंडळाच्या मूर्तीचे विसर्जन करण्यात आले. तर एसीसी रोड येथे एकूण ६० मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. मुलुंड पश्चिम स्वप्न नगरी येथे तयार करण्यात आलेल्या कृत्रिम तलावात सार्वजनिक गणेश मंडळातील ९ आणि घरगुती २४७ मूर्तींचे विसर्जन करण्यात आले.*







# गणेश भक्तांनी साश्रू नयनांनी दिला बाप्पाला निरोप

सर्व मुलुंडकरांना सुख शांती लाभो, हीच गणेशा चरणी प्रार्थना करतो. गणरायाला निरोप देताना सर्वांच्या डोळ्यात अश्रू असतात आणि गणराया हा आपल्या मुक्कामी जात असतो. निश्चित प्रत्येक वेळेस पुढच्या वर्षी लवकर या हीच आपण प्रार्थना करत असतो. गणपती बाप्पा, मोरया पुढच्या वर्षी लवकर या. – मनोज कोटक, खासदार

प्रत्येक वर्षी अनंत चतुर्दशीच्या दिवशी भाविकांसाठी वडापावचे वाटप करतो. विसर्जनासाठी येणाऱ्या सर्व बाप्पांचे फुलांनी स्वागत करतो. हा उत्सव महाराष्ट्रातील मोठा उत्सव आहे. लाखो भाविक बाप्पाचे विसर्जन करण्यासाठी येत असतात. या दिवसात सर्वत्र आनंदाचे वातावरण असते. असेच वातावरण प्रत्येक वर्षी राहो ही अपेक्षा व्यक्त करतो. गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या, गणपती गेले गावाला, चैन पडेना आम्हाला. – मिहीर कोटेचा, आमदार

गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या. सर्व गणेश भक्तांना होम टाइम्स, होम नेट आणि होम केबलच्या वतीने हार्दिक शुभेच्छा. गुरुवारी दु:खित अंत:करणाने बाप्पाचे विसर्जन झाले. ज्याचे सर्जन आहे त्याचे विसर्जनही आहे, हे आपल्याला शिकण्यास मिळते. जे दु:ख आहे त्याचे देखील विसर्जन झाले. आम्ही आशा, शुभकामना देतो की प्रत्येकाच्या घरात सुख शांती आणि समाधान येवो. – माया कोठारी, समाजसेविका



दहा दिवस आधी आपल्या येथे गणपती येत होते. आता त्यांचे विसर्जन झाले आहे. मी गणेश चरणी हीच प्रार्थना करेन की, आपल्या देशावर कुठलेही संकट येऊ नये. भारताचा प्रत्येक नागरिक सुख समृद्धीने राहील हीच प्रार्थना. –उत्तम गीते, काँग्रेस कार्याध्यक्ष, ईशान्य मुंबई

आम्ही सगळे जाणतो की, हे गणपती बाप्पा कुठल्या एका धर्माचे नाहीत. मुस्लिम असो, शीख असो, ख्रिश्चन वा हिंदू. गणपती बाप्पावर प्रत्येकाची श्रद्धा असते. अनंत चतुर्दशीच्या दिवशी मी सर्व भक्तांना शुभकामना देतो –नील सोमय्या, मा. नगरसेवक

अनंत चतुर्दशीच्या सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा देत असताना, ज्या देवाने या सृष्टीचा घडाव केला, त्या देवाकडे हीच मागणी आहे की, सर्वसामान्य जनतेला सुख समृद्धी आणि भरभराटीचे दिवस येऊ दे. मी लहान असल्यापासून हे बघत आलेलो आहे. गणेश उत्सव मुलुंड मध्ये मोठ्या प्रमाणात साजरा केला जात असतो. मुलुंड पूर्वे कडे मोठ्या आनंदाने विसर्जन सोहळा आयोजित केला जात असतो. ही परंपरा आजही चालू आहे. गणपती बाप्पा मोरया.

– केदार दिघे,
ठाणे जिल्हा प्रमुख, उबाठा

गणपती बाप्पाकडे माझे एकच मागणे आहे की, जाती धर्म आणि भाषा यांच्या पलीकडे जाऊन सर्व नागरिक सुखा समाधानाने नांदू देत. जेणेकरून सामाजिक सलोखा अबाधित राहील.

– सत्यवान दळवी,
मनसे उपविभाग अध्यक्ष

अनंत चतुर्शीचा दिवस म्हणजे गणरायाला भावपूर्ण आणि शाश्रू न्याय नयनांनी निरोप देण्याचा दिवस. या दिवशी मी गणरायाकडे एकच मागण मागतो की, मुलुंडकरांना सुख समृद्धी लाभो आणि आमच्या हातून त्यांची सेवा घडो.

– जगदीश शेट्टी,
विभाग प्रमुख, शिवसेना

## मुलुंड पूर्वेला मोठमोठ्या मूर्तींचे विसर्जन

मुलुंड पूर्वेतील मोरया तलाव येथेही विशेष व्यवस्था करण्यात आली असून, तलावाभोवती क्रेनची व्यवस्था करण्यात आली आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या उंच गणेशमूर्तींचे क्रेनच्या साहाय्याने तलावात विसर्जन करण्यात आले. मंडपमधून येणाऱ्या मोठ्या मूर्तींच्या विसर्जनासाठी महापालिकेकडून स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली होती.

## साध्या वेशात पोलीसही तैनात

संपूर्ण उत्सवादरम्यान प्रत्येक कृत्रिम तलावाजवळ मुंबई महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी तैनात करण्यात आले होते. त्यासोबतच तलावांच्या आजूबाजूला स्वच्छताही ठेवण्यात आली होती. जीवरक्षक, सीसीटीव्ही कॅमेरे आणि प्रथमोपचाराची सुविधाही मुंबई महापालिकेकडून उपलब्ध करून देण्यात आली होती. मुंबई पोलिसही समाजकंटकांवर करडी नजर ठेवून होते. समाजकंटकांवर कडक कारवाई करण्यासाठी साध्या वेशातील पोलिसही तैनात करण्यात आले होते.

## भाविकांसाठी अल्पोपाहाराची व्यवस्था

गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा गणेशोत्सवाच्या शेवटच्या दिवशी अनेक राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांनी विसर्जनासाठी जाणाऱ्या भाविक व नागरिकांसाठी ठिकठिकाणी अल्पोपाहाराची व्यवस्था केली होती. यासोबतच मुलुंड पश्चिम एलबीएस रोडवर विविध राजकीय पक्षांचे मंडपही उभे केले होते. ज्यामध्ये भारतीय जनता पार्टी, होम केबल, उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना आणि काँग्रेस पक्षाचा समावेश आहे. बाप्पाचे विसर्जन करण्यासाठी जाणाऱ्या भाविकांवर याठिकाणी फुलांची उधळण केली जात होती.







## संपादकीय ■ हेमांशू कोठारी

# एक तास, एक साथ

दरवर्षी २ ऑक्टोंबरला राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची देशभरात नव्हे तर जगातील काही देशांमध्येही साजरी केली जाते. त्यांच्या जयंतीचे औचित्य साधून देशात स्वच्छ भारत अभियान देखील चालविले जाते. यंदाही केंद्र सरकारकडून महात्मा गांधीं यांची १५४ वी जयंती 'एक तारीख, एक तास, एक साथ' नावाने साजरी केली जात आहे. देशाला स्वच्छतेचे महत्व समजावे यासाठी १ ऑक्टोबर २०२३ रोजी सार्वजनिक ठिकाणांवरून उपरोक्त नावे मेगा स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. महात्मा गांधींनी स्वच्छता केवळ शारीरिक आरोग्यासाठीच नव्हे, तर मानवी समाजाच्या नैतिक आणि सामाजिक आरोग्यासाठीही महत्त्वाची मानली. त्यांनी स्वच्छतेकडे समाजाच्या हितासाठी केलेली सेवा म्हणून पाहिले. 'एक तारीख, एक तास, एकत्र' ही मोहीम गांधी जयंतीच्या स्मरणार्थ एक मोठी स्वच्छता मोहीम आहे. हा उपक्रम 'स्वच्छता पखवाडा-स्वच्छता सेवा' २०२३ मोहिमेचा दुवा आहे. पंतप्रधान मोदी यांनी १ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता सर्व नागरिकांना स्वच्छतेसाठी १ तास दान करण्याचे आवाहन केले आहे. देशाला संबोधित करताना ते म्हणाले, १ ऑक्टोबर रोजी म्हणजेच रविवारी सकाळी १० वाजता स्वच्छतेवर एक मोठा कार्यक्रम आयोजित केला जाणार आहे. १ ऑक्टोबर रोजीच्या देशव्यापी मोहिमेमध्ये सर्व स्तरातील नागरिकांना बाजार, रेल्वे ट्रॅक, जलकुंभ, पर्यटन स्थळे, सरकारी कार्यालये आणि धार्मिक स्थळे इत्यादी सार्वजनिक ठिकाणांच्या भौतिक स्वच्छतेच्या कार्यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. प्रत्येक शहर, ग्रामपंचायत, सरकारचे सर्व क्षेत्र जसे नागरी विमान वाहतूक, रेल्वे, माहिती आणि तंत्रज्ञान इत्यादी आणि सार्वजनिक संस्था नागरिकांच्या नेतृत्वाखाली स्वच्छता कार्यक्रम राबवत आहेत. केवळ प्रौढच नाही तर शाळकरी मुलेही या मोहिमेचा भाग बनत आहेत. या अभियानाबाबत शाळांमध्ये मुलांना जागरुक केले जात आहे. गांधी जयंतीनिमित्त स्वच्छता हा सेवेचा महत्त्वाचा संदेश आहे. स्वच्छता आणि स्वच्छतेला महत्त्वाचा भाग बनवणाऱ्या महात्मा गांधींच्या विचारांचा आणि मूल्यांचा प्रसार करणारा संदेश यातून मांडण्यात आला आहे. गांधी जयंतीनिमित्त 'स्वच्छताही सेवा' हा संदेश आपल्याला आठवण करून देतो की, आपण आपल्या सभोवतालची ठिकाणे स्वच्छ आणि आरोग्यदायी बनवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ही मोहीम मोठ्या प्रमाणात स्वच्छतेबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी नागरिकांसोबत काम करण्याच्या आमच्या प्रयत्नांचे आणि स्वच्छ आणि निरोगी भारताच्या दिशेने आमच्या मोजलेल्या पावलांचे प्रतीक आहे. देशाची सध्याची परिस्थिती लक्षात घेता पंतप्रधान मोदींचा हा उपक्रम स्तुत्य आहे. देशातील वाढती अस्वच्छता दूर करण्यासाठी आणि देशातील शहरांना नंबर वन बनवण्यासाठी 'स्वच्छताही सेवा' अभियान नागरिकांना प्रेरित करत आहे. 'स्वच्छताही सेवा' मोहिमेद्वारे अस्वच्छता दूर करता येते, त्यामुळे जनतेचे आरोग्य सुधारते. कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन आणि स्वच्छ पाण्याची गरज लक्षात घेऊन जनतेसाठी आरोग्यदायी आणि चांगले वातावरण निर्माण होऊ शकते. 'स्वच्छताही सेवे'च्या माध्यमातून कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन आणि प्लास्टिक प्रदूषण कमी करण्यासाठी प्रयत्न केले जाऊ शकतात, ज्यामुळे पर्यावरणाचे रक्षण होण्यास मदत होऊ शकते. ' स्वच्छताही सेवा' मोहिमेद्वारे शिक्षणाचा संदेश दिला जाऊ शकतो, ज्यामुळे लोकांमध्ये स्वच्छतेचे महत्त्व वाढू शकते. या मोहिमेद्वारे महात्मा गांधींना त्यांच्या १५४ व्या जयंतीनिमित्त आदरांजली वाहण्यात येणार आहे. याअंतर्गत देशातील सर्व जनता एकत्र येऊन एकाच वेळी स्वच्छतेसाठी श्रमदान करून आपल्या राष्ट्रपित्याला आदरांजली वाहण्यासाठी एक तास एकत्र येणार आहेत. चला तर मग, आपणही या मोहिमेचा भाग होऊ या.

# सुप्रिया सुळे यांनी मुलुंडच्या सार्वजनिक गणेश मंडळांमध्ये घेतले बाप्पाचे दर्शन



■ होम टाइम्स टीम

राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी मंगळवारी मुलुंड येथील सार्वजनिक गणेश मंडळात बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी उपस्थिती लावली होती. या काळात त्यांनी मंडळातर्फे आयोजित कार्यक्रमांमध्येही सहभाग घेतला.

आगामी निवडणुकीपूर्वी मंडपाबाहेर गणेशोत्सवाच्या काळात एकीकडे राजकीय पक्षांचे बॅनर लावले गेले, तर दुसरीकडे लोकप्रतिनिधी सर्व मंडळांमध्ये जाऊन बाप्पाचे दर्शन घेताना दिसले. मंगळवारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे यांनी मुलुंडमध्ये उपस्थिती नोंदवली होती. त्यांनी मुलुंड पूर्व येथील म्हाडाचा राजा आणि चिंतामणी राव देशमुख उद्यान येथील बाल मित्र मंडळ सार्वजनिक गणेश मंडळ येथे बाप्पाचे दर्शन घेतले.

या काळात मंडळाने आयोजित केलेल्या कार्यक्रमांमध्येही त्या सहभागी झाल्या होत्या. एवढेच नाही तर येत्या काळात होणाऱ्या महानगरपालिकेच्या निवडणुकीचाही या निमित्ताने धांडोळा घेतलेला दिसून आला. तर या निवडणुका २०२५ मध्ये होतील, अशी खिल्लीही सुळे यांनी उडवली.



Club ID #131028-026139 | District 3231 A2 | Region III | Zone II | - LY 2023-24

# LION LADY AUXILIARY MULUND

Chartered as LION CLUB OF BOMBAY MULUND, Chartered on: 15-03-1964

## CELEBRATING 60 YEARS OF LEGACY

## WITH 116 PROJECTS

# SERVICE WEEK

## 1st - 8th OCTOBER 2023



**LL Maya Kothari**
October Service Week Chairperson



**LL Jyotsna Majethia**
October Service Week Chairperson



**LL Aarjuli Chheda**
Club Secretary



**LL Shushma Thakker**
President



**LL Hiran Kothari**
Club Treasurer

## " SERVICE BY HEART "

| TIME | PROJECT DETAIL | DONOR | VENUE | BENEFICARY |
|---|---|---|---|---|
| SUNDAY, 1st October 2023 | | | | |
| 8:30AM Onwards | DISTRIBUTION OF ANAJ TO 100 FAMILY | LL JYOTSNA MEJETHIA | LIONS CLUB OF MULUND CHIEF GUEST: MAYUR LAKHANI | 300 |
| | DISTRIBUTION OF ANAJ TO 25 HANDICAPPED FAMILY | LL JYOTIBEN SHAH | | 75 |
| | DISTRIBUTION OF ANAJ TO 10 DIFFERENTLY ABLED | LL SHEEL ARORA | | 10 |
| | **DONATION FOR BRIGHT FUTURE** | | | |
| | COLLEGE FEES | MRS.ALKA THAKKER | | 1 |
| | COLLEGE FEES | LL SHILPA SHAH | | 2 |
| | **EMPOWERING HEALTH** | | | |
| | DIALYZERS FOR KIDNEY PATIENTS | LLA MEMBERS | | 40 |
| | MEDICAL AID TO DIALYSIS PATIENT | LL BINA KHONA | | 1 |
| | MEDICAL AID TO CANCER PATIENT | LL BINA KHONA | | 1 |
| | DONATION OF WHEEL CHAIR | LL ANURADHA GOYAL | | 1 |
| | DISTRIBUTION OF HYGIENIC KIT | LL HELENA VIRANI | | 25 |
| | **WOMAN EMPOWERMENT** | | | |
| | DONATION OF SEWING MACHINES | LL DIPTI JOBANPUTRA | | 2 |
| | | LL KASHMIRA PATEL | | 1 |
| | | LL KASTUR KARANI | | 1 |
| | DONATION OF BIDDING MACHINE | LL MINAL SHAH | | |
| L | | | | |
| | **MEDICAL CAMP** | | | |
| | DIABETES CAMP FOR SENIOR CITIZENS | LL MAYA KOTHARI | TIRUMALA HABTIATS CHIEF GUEST: PRIYDEV SHRIMANGALAM | AT LARGE |

| TIME | PROJECT DETAIL | DONOR | VENUE | BENEFICARY |
|---|---|---|---|---|
| 10:30AM Onwards | EYE CHECK UP CAMP FOR MAIDS & STAFF | LL MAYA KOTHARI | TIRUMALA HABTIATS CHIEF GUEST: JIGNESH DOSHI | AT LARGE |
| | FREE DISTRIBUTION OF SPECTACLES | LL MAYA KOTHARI | TIRUMALA HABTIATS | 100 |
| | FOOD PACKET DISTRIBUTION TO MAIDS | LL MAYA KOTHARI | TIRUMALA HABTIATS | 100 |
| | | | | |
| | DONATION OF 180 KG RICE TO OLD AGE HOME | LION GAURAV THAKKAR | BANYAN TREE , CHANDAN BAUG ROAD,MULUND WEST | 25 |
| | FEEDING OF STRAY DOGS | LL MAYA KOTHARI | DEVIDAYAL ROAD | |
| | MEALS FOR SLUM CHILDREN | LL AARTI DOSHI | NIRMAL JYOT FOUNDATION, LBS MARG | 100 |
| | | | | |
| MONDAY, 2nd October 2023 | | | | |
| 8:30AM OnWards | LIONS CLUB RALLY | | LIONS CLUB OF MULUND | |
| | | | | |
| | **SILVER SUPPORT** | | | |
| 12:00PM Onwards | SENIOR CITIZEN - DIAPERS DISTRIBUTION | LL SARITA AGGARWAL | NITI FOUNDATION OLD AGE HOME YEOOR CHIEF GUEST: LION ANAND AGARWAL | 20 |
| | DONATION OF BATHROOM, CLEANING SUPPLIES | | | |
| | DONATION OF HYGIENE ITEMS | | | |
| | DONATION OF GROCERIES - 10KG DAL & 15 LITRES OIL | | | |
| | FULL DAY MEAL TO SENIOR CITIZEN | | | |
| | | | | |
| 1:00PM Onwards | COW FEEDING AT GAUSHALA | LLA MEMBERS | YEEOR VILLAGE | AT LARGE |
| | | | | |
| 04:30PM Onwards | BLANKETS DISTRIBUTION | LL MAYA KOTHARI | LANDMARK BUILDING | 100 |
| | MEAL DISTRIBUTION | | | |
| | | | | |
| | ANIMAL WELFARE | | | |

| TIME | PROJECT DETAIL | DONOR | VENUE | BENEFICARY |
|---|---|---|---|---|
| 05:30PM Onwards | DONATION OF RICE & MEDICINE FOR STRAY DOGS | LL MAYA KOTHARI, LL VASANTI LODAYA , LL PRITI KOTAK | UTKARSH FOUNDATION | |
| 07:00PM Onwards | FEEDING STRAY DOGS | LL MAYA KOTHARI | DEVIDAYAL ROAD | |
| | FITTING DOGS WITH RADIUM COLLAR | LL MAYA KOTHARI | TIRUMALA HABITATS | |
| | MEAL TO SLUM CHILDREN | LL MONA SHAH & LLMEENA KOTHARI | NIRMAL JYOT FOUNDATION, LBS MARG | 250 |
| **TUESDAY, 3rd October 2023** | | | | |
| LL GEETA BHINDE | DONATION OF WATER COOLER | LL NIKITA MANISH SHAH | VEER SAVARKAR HOSPITAL, MULUND EAST | AT LARGE |
| | DONATION G UD CHANA TO PREGNANTWOMEN | LL SHILPA BHANSALI | | 90 |
| 12:00PM Onwards | DONATION OF CLOTHES TO NEW BORN(WITH LIONS) PERMANENT PROJECT | LL SHEEL ARORA | | 30 |
| | DONATION OF BABY QUILT PERMANENT PROJECT | LL DAKSHA SHAH, LLSUNITA DESAI , LLRASILA GOR,LL ASHA SARDANA, LLMAYA KOTHARI, LLSUSHMA THAKKER | M.G.HOSPITAL MULUNDWEST | |
| | DONATION OF NEWBORN BABYCLOTHES WITH LIONS | LL SHEEL ARORA | | |
| | STUDENT EMPOWERMENT | | | |
| | DONATION OF SPORTS ITEMS | LL DIPTI JOBANPUTRA | GV SCHEME GUJRATI SCHOOL MULUND EAST | 120 |
| | DONATION OF COMPUTER | | | |
| | SLICE CAKES TO CHILDREN | | | |
| | DONATION OF WORKBOOKS | LL RAJUL CHHEDA | | |
| | BLUETOOTH SPEAKER AND MIKE | LL NEELAM RAJDE | | |
| | DESK BENCHES | LL ALKA BHINDE | MITHAGAR MPS SCHOOL, MULUND EAST | 13 |
| | | LL SHARDA RUNGTA,JIGNA SHAH,JYOTI BEN SHAH | | 7 |
| | SLICE CAKES TO CHILDREN | LL JYOTIBEN SHAH | | 50 |
| | FULL SIZE SHATRANJI -2 | LL SUSHMA AGARWAL | | AT LARGE |
| | DONATION OF 4 FANS,10 TUBELIGHT | LL VATSALA PADMASHALI | | AT LARGE |
| | BLUE TOOTH SPEAKER & MIKE | LL NEELAM RAJDE | | AT LARGE |
| | DONATION OF 2 SHATRANJI | LL GEETA BHINDE | GAVANPADA MARATHI SCHOOL | AT LARGE |
| | SLICE CAKES TO CHILDREN | LLGEETA BHINDE | | |
| 04:00PM Onwards | DONATION OF LONG BOOK, 30 DOZEN | LL SUNITA DESAI , LL MRINALINI PATIL, LL SHARDHA JOSHI, LL RAJUL KUWADIA, LL GEETA BINDE | NIRMAL JYOT FOUNDATION, LBS MARG | 65 |
| | STATIONARY & STEEL GLASSES | | | |
| | MEALS FOR KIDS | LION MAYUR LAKHANI | PANDURANG SCHOOL | 250 |
| | | LL JASMINE CHHEDA | AXF FOUNDATION | |
| | LOLLYPOPS FOR SCHOOL CHILDREN | LL MAYA KOTHARI | IN ALL SCHOOLS | |
| | FEEDING STRAY DOGS | | DEVI DAYAL ROAD | |
| **WEDNESDAY, 4th October 2023** | | | | |
| 10:00AM Onwards | DONATION OF 40 DESKS BENCHES | LL MRUDULA SHAH | DD UPADHAY, DUMPING ROAD, | 40 |
| | DONATION OF FANS, LIGHTS | LL DIPTI JOBANPUTRA | | |
| | SLICE CAKES TO CHILDREN | LL MRUDULA SHAH | | |
| 11:00AM Onwards | DONATION OF 20 DESK BENCHES | LL ALKA BHINDE | GHATIPADA SCHOOL, MULUND COLONY | 35 |
| | SLICE CAKES TO CHILDREN | | | |
| 12:00PM Onwards | DONATION OF PRINTER | LION PUSHPAL SANGHVI | HANUMANPADA MULUND COLONY | 50 |
| | DONATION OF CHARTS | LL REKHA JAJU | | |
| | SLICE CAKES TO CHILDREN | LL MONA SHAH | | |
| 1:00PM Onwards | DONATION OF DESK BENCHES | LL NEEPA LAKHANI | LB.S. SCHOOL, CHECK NAKA | 120 |
| | SLICE CAKES TO CHILDREN | | | |
| 2:00PM Onwards | DONATION OF COMPUTER FOR DIFFRENTLY ABLED KIDS | MANSI CHHEDA (LL ARJULI CHHEDA) | GAUSHALA SCHOOL | 40 |
| | SLICE CAKES TO CHILDREN | LL AARJULI CHHEDA | | |
| | DISTRIBUTION OF GAMES & COLRING BOOKS | MR.KRISH SHAH (LL JYOTSNA MAJETHIA) | | |
| | FEEDING STRAY DOGS | LL MAYA KOTHARI | | |
| | DISTRIBUTION OF LOLLYPOPS | LL MAYA KOTHARI | | |
| | DISTRIBUTION OF MEALS TO SLUM KIDS | LL BHAVNA KOTHARI | PANDURANG SCHOOL AFX FOUNDATION | 250 |
| | CONSTRUCTION OF ROOM AND RENOVATION OF TOILET | LL SHAILAJA SHAH, LL NIKITA SHAH | TARABEN MODAK GARDEN | |
| | OPEN GYM | | | |
| **THURSDAY, 5th October 2023** | | | | |
| 12:00PM Onwards | DONATION OF SCHOOL BAGS | KRISH SHAH (LL JYOTSNA MAJETHIA) | SANJEEVANDEEP FOUNDATION | 60 |
| | SKIPPING ROPES | | | |
| | SNACKS | | | |
| | RENOVATION OF SCHOOL GROUND | LL SAROJ MONGIA | | |

| TIME | PROJECT DETAIL | DONOR | VENUE | BENEFICARY |
|---|---|---|---|---|
| 2:30PM Onwards | DONATION OF STATIONERY,BLACKBOARD, CRAFT MATERIAL | LL SHAILAJA SHAH | KANAMWR NAGAR SCHOOL, VIKHROLI | 41 |
| | DONATION OF WORKBOOKS | LL RAJUL CHHEDA | | |
| | SLICE CAKES TO CHILDREN | LL SHAILAJA SHAH | | |
| 3:30PM Onwards | CRAFT MATERIAL & NOTEBOOK | LL RASILA GOR | TAGORE NAGAR, GUJRATI SCHOOL | |
| | WORKBOOKS | LL RAJUL CHHEDA | | |
| | SLICE CAKES TO CHILDREN | | | |
| | EYE CHECKUP CAMP FOR KIDS | LLA | RAJIVGANDHI SCHOOL, BPS | |
| | STATIONARY FOR KIDS | LL MAYA KOTHARI | DEVIDAYAL ROAD | |
| 4:00PM Onwards | DONATION OF SPORTS ITEMS | Ms.GARGI SHAH (LL SHAILAJA SHAH) | SPR JAIN KANYASHALA, GHATKOPAR | |
| | FEEDING STRAY DOGS | LL MAYA KOTHARI | | |
| | DISTRIBUTION OF LOLLYPOPS | LL MAYA KOTHARI | | |
| | DISTRIBUTION OF MEALS TO | LL MEENA KOTHARI | PANDURANG SCHOOL | |
| | SLUM KIDS | LL BHAKTI SANGHAVI | AXF FOUNDATION | |
| 6:30PM Onwards | DONATION OF ONE CUPBOARD | | MAZGAON SCHOOL | |
| | MEALS FOR KIDS | LL AARJULI CHHEDA, LL VASANTI LODAYA | NIGTH SCHOOL, MULUND WEST | |
| | SCHOOL BAGS 40 | LL PARUL SAVLA | NIGHT SCHOOL | |
| | GEOMETRY BOX 40 | | | |
| 7:00PM Onwards | KHICHDI KADI MEAL | LLA | LOHANA MAHAJAN WADI | |
| **FRIDAY, 6th October 2023** | | | | |
| | ANNOUNCEMENT OF BOREWELL | LL ANURDHA GOYAL, | WADA | |
| | ANNOUNCEMENT OF BOREWELL | LL MAYA KOTAHRI & LL SHEEL ARORA. | WADA | |
| | RENOVATION OF BOREWELL | LL INDIRA SHARMA | WADA | |
| | CHAITNAYA VIDYALAY SCHOOL , CHILDRENS GARDEN | LL SHAILAJA SHAH, | SHAHAPUR | |
| | COMPUTER LAB | LL DINA GADA | WADA | 600 |
| | CHILDRENS GARDEN | AKRUTI SOHAM MAJETHIA, VIDHI HARSH MAJETHIA & HRIDAAN TUSHAR MAJETHIA (LL JYOTSNA MAJETHIA) | ADARSH HINDI PATHSHALA - WADA | |
| | PLUMBING AND CIVIL REPAIR WORK | | ADARSH HINDI PATHSHALA - WADA | 250 |
| | LIGHTS FOR SCHOOL | LL JYOTSNA MAJETHIA | | |
| | SCHOOL RENOVATION | LL DEEPTI JOBANPUTRA, RITA JAIN, ANJU ASHAR, JANAK KOTHARI, MANISHA DOSHI, CHARMI GALA & LLA | ADARSH HINDI PATHSHALA - WADA | |
| | DOG FEEDING | LL MAYA KOTHARI | DEVIDAYAL ROAD | |
| | MEAL FOR SLUM KIIDS | LL SUSHMA AGARWAL | PANDURANG SCHOOL, AXF FOUNDATION | 250 |
| | STATIONARY | LL MAYA KOTHARI | | |
| **SATURDAY, 7th October 2023** | | | | |
| 11:00AM Onwards | RAJVEETA LEARNING FOUNDATION - CP UNIT / SNACKS | LL HIRAN KOTHARI | MULUND COLONY | 20 |
| | SNACKS | | | |
| 3:00PM Onwards | WATER COOLER | ARYA AVANI GANESH IYER ( LL MAYA | TITWALA | 1 |
| | SNACKS BOX | LL RITA KATYAL | TITWALA | 1 |
| | TREE PLANATATION | LL MAYA KOTHARI | | PI |
| | ANNOUNCMENT OF CHECK DAM AT PENCH | LL SHEEL ARORA, LL GEETA BHINDE, SHEETAL THAKKER, ARJUN WADEKAR, VIRAY KACHWALA | NAGPUR | 1 |
| | SOLAR DETERANT - PENCH | LL SHEEL ARORA, LL MAYA KOTHARI , LL HELANA VIRANI LL SHAILAJA SHAH | NAGPUR | 1 |
| | DOG FEEDING | LL MAYA KOTHARI | DEVIDAYAL ROAD | |
| | MEAL | LL NEETA THAKKAR, LL SHAILAJA SHAH | PANDURANG SCHOOL, AXF FOUNDATION | 250 |
| **SUNDAY, 8th October 2023** | | | | |
| 10:00AM Onwards | CANCER SCREENING TEST ( MEMOGRAPHY & SONOGRAPHY BLOOD TEST, PEP TEST) | LLA, LOHANA MAHAJAN WADI & LL MEENA KOTHARI | LOHANA MAHAJAN WADI | 89 |
| 10:30AM Onwards | ADOPTION OF ONE STUDENT - GRADE 10TH - 11TH - 2 ANNUAL FEES | LL SUSHMA THAKKER | SEED FOUNDATION | 1 |
| 11:00AM Onwards | EYE CHECK CAMP | LLA | PANDURANG SCHOOL, NAVBHARAT SCHOOL | 300 |
| | DOG FEEDING | LL MAYA KOTHARI | DEVIDAYAL ROAD | |
| | MEAL | LL KIRAN CHHABARA | PANDURANG SCHOOL, NAVBHARAT SCHOOL | 100 |
| | DISTRIBUTION OF HYGIEN KIT | LLA | | 150 |
| | DISTRIBUTION OF 1200 PENS | LL MAYA KOTHARI | | |

# मुलुंडमध्ये गणपती विसर्जनात जमा झाले १७ टन निर्माल्य

■ होम टाइम्स टीम

मोठ्या थाटामाटात साजऱ्या झालेल्या गणेशोत्सवानंतर मुंबईत निर्माल्यात मोठी वाढ झाली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा यात ही वाढ झाली आहे. मुलुंडमध्येही यंदा हे चित्र दिसून आले आहे. मात्र निर्माल्या सोबतच यंदा बंदी घातलेल्या प्लास्टिकचा आलेखही वाढल्याचे चिंतादायक चित्र दिसून आले आहे.

२९ सप्टेंबर रोजी मुंबईसह देशभरात १० दिवसीय गणेश उत्सवाची मोठ्या उत्साहात सांगता झाली. यंदा मोठ्या संख्येने नागरिकांनी घरोघरी बाप्पाची प्रतिष्ठापना केली होती. सार्वजनिक मंडळांच्या संख्येतही यंदा वाढ झालेली दिसून आली. या उत्सवादरम्यान नागरिकांनी विविध वस्तूंचा वापर करून बाप्पाच्या मंडपाची सजावट केली होती. मात्र, बाप्पाला अखेरचा निरोप दिल्यानंतर ही सर्व फुले, हार, प्लास्टिक आदी साहित्य निर्माल्य केंद्रातील कलशात टाकले गेले. त्यानंतर मुंबई महापालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून ते गोळा करून पुढील प्रक्रियेसाठी पाठविले गेले. मुलुंड टी वॉर्डने दिलेल्या आकडेवारीबद्दल बोलायचे झाल्यास, यावर्षी मुलुंड पूर्व आणि पश्चिमेकडील ९ निर्माल्य केंद्रातून एकूण १७ हजार किलो निर्माल्य जमा झाले होते. त्यामध्ये तब्बल २ टन म्हणजे २००० किलो फक्त प्लास्टिक, थर्माकोल आणि इतर सुका कचरा होता. हे संकलित निर्माल्य आता कंपोस्ट खत तयार करण्यासाठी वापरण्यात येणार आहे.

## गेल्या वर्षीच्या तुलनेत झाली तीन हजार किलोने वाढ

मात्र, निर्माल्यच्या कलशातील प्लास्टिक काढण्यासाठी टी वॉर्ड तसेच इतर वॉर्डातील कर्मचाऱ्यांना मोठी कसरत करावी लागली. या निर्माल्यांपासून बनवलेले कंपोस्ट खत रोपांसाठी खूप फायदेशीर आहे.

२०२२ मध्ये झालेल्या गणेश उत्सवादरम्यान १४ हजार किलो निर्माल्य जमा झाले होते. त्यात केवळ २ टन प्लास्टिक जमा झाले होते. मात्र यंदा यामध्ये वाढ झालेली दिसून आली. प्लॅस्टिकवर संपूर्ण बंदी असतानाही प्लास्टिकची विक्री दिवसेंदिवस वाढत असून प्लॅस्टिकचा बिनदिक्कत वापर होत असल्याचे या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. मुंबई महानगरपालिकेने नागरिकांना आवाहन केले आहे की, सण धूमधडाक्यात साजरा करण्यासोबतच नागरिकांनी पर्यावरणाची होणारी हानी याकडेही लक्ष द्यावे आणि बंदी असलेल्या प्लास्टिकचा वापर न करून पर्यावरणपूरक सजावट करावी.

# सर्वोच्च न्यायालयाने घेतला मोठा निर्णय

## मुंबईमधील दुकानदारांना दोन महिन्यांत लावावे लागणार मराठी नावाचे फलक




■ होम टाइम्स टीम

मराठी नामफलकाबाबत सर्वोच्च न्यायालयाने मोठा निर्णय घोषित केला आहे. हा निर्णय मुंबईतील दुकानदारांना लागू असून येथील दुकानदारांना त्यांच्या दुकानांचे नामफलक आता मराठी भाषेत लिहावे लागणार आहेत. यासाठी न्यायालयाने दुकानदारांना दोन महिन्यांचा अवधी दिला आहे.

हल्ली सणासुदीचे दिवस आहेत. त्यामुळे दुकाने आणि बाजारपेठा ग्राहकांनी भरलेल्या असतात. अशावेळी दुकांनाचे फलक मराठी भाषेतून असण्याचा मुद्दा पुन्हा तापला आहे. सोमवारी याबाबत सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. या निर्णयानुसार आता मुंबईतील दुकानदारांना त्यांच्या दुकानांचे फलक मराठी भाषेतून लिहावी लागणार आहेत. म्हणजेच आता दिवाळी, दसरा यांसारख्या सणांआधीच असे नामफलक झळकणार आहेत. न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्न आणि उज्वल भुईया यांनी महाराष्ट्र सरकारने गेल्या वर्षी लागू केलेल्या नियमाचे घटनात्मक आव्हान विचारात घेण्याचे मान्य केले. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर एकीकडे दुकानदारांना दोन महिन्यांची वाढीव मुदत देण्यात आली असताना दुसरीकडे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत केल्याचे ट्विट केले आहे. पक्षाचे कार्यकर्ते याकडे लक्ष ठेवतील असेही ते म्हणाले. या निर्णयाचे दुकानदारांनी सुध्दा स्वागत केले आहे. मुलुंडबद्दल बोलायचे झाले तर मुलुंडमधील बहुतांश दुकाने आणि संस्थांवर मराठीत नावाचे फलक आहेत. मात्र अजूनही अनेक दुकाने अशी आहेत जिथे इंग्रजीत नावे लिहिलेली आहेत. दुकानदारांना ती लवकरात लवकर बदलण्यास सांगण्यात आले आहे. तसे न झाल्यास येत्या काही दिवसांत हा मराठी नावाचे बोर्ड प्रकरण काय नवीन वळण घेते हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. दरम्यान कर्नाटकातही तेथील मात्र भाषेत फलक लिहिण्याचा असाच नियम लागू करण्यात आला आहे.

# गोरेगाव–मुलुंड लिंक रोड प्रकल्पाचा खर्च दुप्पट झाला

## आता महापालिका सहा नव्हे तर १२०० कोटी खर्च करणार

■ होम टाइम्स टीम

कास्टिंग यार्ड आणि जीएमएलआर (गोरेगाव मुलुंड लिंक रोड) प्रकल्पांतर्गत बांधण्यात येणाऱ्या दोन बोगद्यांच्या देखभालीवरील खर्चामुळे प्रकल्पाची किंमत जवळपास दुप्पट झाली आहे. आधी या कामाचा खर्च सहा हजार कोटी होता आता वाढून तो १२ हजार कोटी रुपये झाला आहे. महापालिका हा खर्च करणार आहे. हा प्रकल्प पाच वर्षात पूर्ण करण्याचे उद्दिष्टही ठेवण्यात आले आहे. मात्र, येत्या काही दिवसांत त्याची किंमतही आणखी वाढण्याची शक्यता आहे.

गोरेगाव मुलुंड लिंक रोड हा मुंबईच्या पूर्व आणि पश्चिम उपनगरांना जोडणारा महत्त्वाकांक्षी प्रकल्प मानला जातो. मात्र या प्रकल्पाच्या उभारणीपूर्वीच त्याची किंमत झपाट्याने वाढू लागली आहे. आता ही किंमत जवळपास दुप्पट झाली आहे. यापूर्वी हा प्रकल्प ६ हजार २७१ कोटी रुपयांना बांधला जाणार होता, आता त्यासाठी ६ हजार ६०२ कोटी रुपये अधिक खर्च होणार आहेत. ज्यामध्ये या प्रकल्पांतर्गत दोन बोगदे बांधण्यात येणार असून कास्टिंग यार्डचे भाडे १३२ कोटी रुपये असेल. या प्रकल्पापासून २५ किलोमीटर अंतरावर हे कास्टिंग यार्ड बांधण्यात येणार आहे. या प्रकल्पाचा डेब्रिज कुठे ठेवण्यात येणार आहे. ते इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये बांधले जाणार आहे. यासोबतच भांडुप महापालिकेचा सर्वात मोठा जलशुद्धीकरण प्रकल्प असल्याने या प्रकल्पामुळे १,८०० मिमी जलवाहिनी वळविण्यात येणार आहे. हा ४.७ किलोमीटरचा बोगदा संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या खालून जाणार असून तो गोरेगाव ते खिंडीपाडा असा बांधला जाणार आहे. यापूर्वी तांत्रिक कारणास्तव हा प्रकल्प उभारण्यासाठी निविदा प्रक्रियेला तसेच जागेअभावी कास्टिंग यार्ड उभारण्यास विलंब झाला होता. या प्रकल्पाचे काम लवकरात लवकर सुरू करण्यात येणार असून येत्या पाच वर्षांत हा प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याचे महापालिकेच्या एका अधिकाऱ्याने सांगितले.

# गणेश मंडळांकडून नियमावलींची झाली पायमल्ली

## राजकीय पक्षांनीही मोडले नियम

■ होम टाइम्स टीम

विसर्जनाच्या दिवशी मुलुंड पश्चिमेकडे यावर्षी प्रशासनाने दिलेल्या नियमावलींची पायमल्ली झालेली पाहायला मिळाली. प्रशासनाने बारा वाजेपर्यंत विसर्जन मिरवणुकांना परवानगी दिली होती. बारानंतर शांततेत आपल्या गणेश मुर्त्या घेऊन विसर्जन तलावांच्या दिशेने जाणे अपेक्षित होते. परंतु बारानंतर देखील मोठ्या प्रमाणात ढोल ताशे आणि डीजेचा आवाज मुलुंडच्या विविध परिसरातून येत होता. त्यामुळे प्रशासनाने दिलेल्य नियमांकडे कानाडोळा करण्याचा हा प्रकार समोर आला.

मुलुंडचा पाच रस्ता ते एलबीएस मार्ग आणि मुलुंड चेक नाका परिसर या ठिकाणी मोठ्या प्रमाणात विसर्जन मिरवणुका या सुरू होत्या. १२ वाजेपर्यंत ढोल ताशे, डीजे वाजविण्यास प्रशासनाकडून परवानगी देण्यात आली होती. परंतु दरवर्षी असणारी १० वाजेपर्यंतची मुदत वगळून यावर्षी सरकारने १२ वाजेपर्यंत वाद्य वाजविण्याची परवानगी दिली असली तरी देखील ही वेळ मुलुंडकरांना कमी पडली की काय असा प्रश्न समोर येतो आहे? कारण १२:३० वाजून गेल्यावरही मुलुंडमध्ये मोठ्या प्रमाणात लाऊड स्पीकर्सचे आवाज, फटाक्यांची आतिषबाजी आणि ढोल ताशांचा नाद ऐकू येत होता. अखेर ज्यावेळी नागरिकांकडून तक्रारी करण्यात आल्या त्यावेळी पोलिसांकडून अशा ढोल ताशा वाजवणाऱ्या मंडळांवर कारवाई करण्यास सुरुवात करण्यात आली. या संपूर्ण उत्सवाच्या दरम्यान राजकीय पक्ष देखील मागे राहिले नाही. १२ वाजल्यानंतर देखील एलबीएस मार्गावर असलेल्या स्वागत मंचावरून मोठ्या प्रमाणात लाऊड स्पीकर वरून गणेश भक्तांना शुभेच्छा दिल्या जात होत्या. येणाऱ्या प्रत्येक मंडळाच्या श्री गणेशाचे स्वागत करण्याची स्पर्धाच या सर्व राजकीय पक्षांच्या मंचावर लागली होती. त्यामुळे या ठिकाणी आवाजाचा डेसिबलचा नियम पायदळी तुडवण्यात आला होता. काही नागरिकांनी आक्षेप घेतल्यानंतर हे सर्व लाऊड स्पीकर बंद करण्यात आले.

## मुलुंडमधील मराठी-गुजराती भाषिक वाद प्रकरण

# भाषिक वाद निर्माण करणाऱ्या सोसायट्यांवर कारवाया केल्या जाव्यात -खासदार मनोज कोटक



पीडीत तृप्ती देवरुखकर



आरोपी निलेश प्रवीण तन्ना



आरोपी प्रवीण तन्ना

■ होम टाइम्स टीम

गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर मराठी आणि गुजराती भाषिक वाद सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. मुलुंडमध्ये घडलेल्या एका कथित प्रकरणावरून हा वाद सुरू असल्याचे दिसते. मुलुंडमध्ये अशा प्रकारचा वाद होत असेल तर दोषी सोसायटीवर कडक कारवाई करण्यात येईल अशी भूमिका मुलुंडचे आमदार मिहिर कोटेचा यांनी घेतली आहे. निबंधक कार्यालयाने अशा प्रकरणात गांभीर्याने लक्ष घालावे अशी मागणीही खासदार आणि आमदार यांनी केली आहे.

याबाबत समजलेली हकीकत अशी की, मुलुंड पूर्वेकडे राहणाऱ्या तृप्ती देवरुखकर या महिलेला मुलुंडमधील तांबे नगर परिसरातील एका सोसायटीमध्ये कार्यालय घ्यायचे होते. यासाठी तृप्ती त्या ठिकाणी गेल्या होत्या. मात्र त्या मराठी भाषिक असल्याने सोसायटीच्या सेक्रेटरी सोबत त्यांचा शाब्दिक वाद झाला. तृप्ती यांच्या आरोपानुसार सदरच्या सोसायटीत मराठी भाषिकांना कार्यालय घेण्यास मनाई असल्याचे तेथील सोसायटीच्या सेक्रेटरी सांगितले. दरम्यान हा वाद तृप्ती त्यांच्या मोबाईलमध्ये चित्रित करत असताना सदर सोसायटीच्या सेक्रेटरीच्या मुलाने त्यांच्या हातातील मोबाईल हिसकावून घेण्याचा प्रयत्न देखील केला होता. असा आरोप तृप्ती यांनी केला आहे. या घटनेनंतर तृप्ती यांनी संदर्भात सोशल मीडियावर पोस्ट केल्यानंतर ही पोस्ट मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली होती. सदर प्रकरणामुळे राजकीय वातावरण देखील चांगलेच गरम झाले होते. तसेच मनसेने देखिल या वादात उडी मारत संबंधित व्यक्तीला त्याच्या कार्यालयामध्ये जाऊन जाब विचारला होता. त्यानंतर पोलिसांनी दोन जणांवर भाषिक वाद केल्या प्रकरणी गुन्हा देखील दाखल केला. या संपूर्ण प्रकरणानंतर आता त्याला राजकीय वळण लागायला सुरू झाले आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून सदर प्रकरणा मागचा बोलाविता धनी हा वेगळा आहे, मराठी माणसाला तोडण्यासाठी शिवसेना फोडली असा आरोप केला, तर यामध्ये भाजपचा हात असल्याचा खासदार संजय राऊत यांनी आरोप केला. या आरोपाला प्रतिउत्तर देत भाजपचे खासदार मनोज कोटक आणि आमदार मिहिर कोटेचा यांनी या घटनेत राजकीय रंग आणणे चुकीचे असल्याचे सांगितले. सदर घटनेच्या संदर्भात आम्ही निबंधक कार्यालयाला अशा प्रकारच्या घटना पुन्हा होऊ नयेत आणि जर एखादी सोसायटी अशा प्रकारचे भाषिक वाद करत असेल तर त्या सोसायटीवर कारवाई करण्याच्या दृष्टिकोनातून पत्र लिहिणार असल्याचे सांगितले. महाराष्ट्राचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी पिडीत महिलेची भेट देखील घेतली आणि महाराष्ट्र या महिलेच्या पाठीशी असल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले. एकंदरीत मराठी गुजराती वादा नंतर आता राजकीय वाद देखील या संपूर्ण प्रकरणात पेटलेला दिसून येतो आहे.

# विसर्जन मिरवणुकीत एकावर कात्रीने केला वार

■ होम टाइम्स टीम

गणेश विसर्जनाच्या उत्साहाला मुलुंड मध्ये गालबोट लागले. मुलुंडमध्ये एका गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीमध्ये धक्का लागला या शुल्लक कारणामुळे झालेल्या हाणामारीत एका तरुणाला गंभीर जखमी केल्याची घटना घडली आहे मुलुंड कॉलनी परिसरात ही घटना घडली.

मुलुंडच्या खिंडीपाडा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या गणपती विसर्जनाची मिरवणूक अमर नगर परिसरात आली होती. या ठिकाणी एकविरा मित्र मंडळ यांचे वाद्य पथक या मंडळामध्ये वाद्य वाजवत होते. मंडळातील विसर्जन मिरवणुकीत नाचत असताना गणेश खंदारे नावाच्या तरुणाचा धक्का एकविरा मित्र मंडळाच्या वाद्य पथकातील अक्षय नामक तरुणाला लागला. त्यानंतर या दोघांमध्ये शाब्दिक बाचाबाची झाली. बाचाबाची सुरू असतानाच अक्षय आणि त्याचा दुसरा सहकारी दीपक या दोघांनी मिळून गणेशला मारहाण करत जवळच असलेल्या कपडे कापायच्या कात्रीने त्याच्या पोटात वार केला. ज्यामध्ये गणेश गंभीर जखमी झाला. त्याला राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून दोघाही आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. या घटनेमुळे विसर्जन मिरवणुकीला गालबोट लागले. दरम्यान पोलीस या संपूर्ण प्रकरणाचा तपास करीत आहेत.

**दोघे अटकेत**

# मुलुंड पश्चिमेत घडली 'हिट अँड रन'ची घटना

## अपघात करुन आरोपी झाला पसार

■ होम टाइम्स टीम

ठाण्याहून गणपती पाहण्यासाठी मोटारसायकलवरून आलेल्या तरुणाला भरधाव वेगात येणाऱ्या वाहनचालकाने जोरदार धडक दिली. या घटनेत तरुणाचा पाय फ्रॅक्चर झाला आहे. सध्या मुलुंड पोलीस अज्ञात कार चालकाचा शोध घेण्यात व्यस्त आहेत.

मुलुंड पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सेंथिलकुमार तेवर हा ठाण्यातील रहिवासी आहे. २४ सप्टेंबर रोजी तो एमएच ०४ एचडब्ल्यू ४७५० या मोटारसायकलवरून मुलुंड येथे गणपती पाहण्यासाठी आला होता. रात्री १०.३० वाजता मुलुंड पश्चिम जटा शंकर डोसा रोडवर येताच एका भरधाव कारने त्याच्या स्कूटरला जोरदार धडक दिली आणि घटनास्थळावरून पळ काढला. ही टक्कर इतकी भीषण होती की, तो तरुण गंभीर जखमी झाला. परिसरातील उपस्थित नागरिकांच्या सहकार्याने त्याला जखमी अवस्थेत जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. या अपघातात त्याचा पाय फ्रॅक्चर झाल्याचे निदान झाल्यानंतर डॉक्टरांनी त्याच्यावर पुढील उपचार केले. त्यानंतर मुलुंड पोलिसांना याबाबतची माहिती देण्यात आली. मुलुंड पोलिसांनी अज्ञात गाडी चालकाविरुद्ध भादंवि कलम २७९, ३३८ आणि मोटार वाहन कायदा १३४ (ए) १३४ (बी) आणि १८४ नुसार गुन्हा दाखल केला. तांत्रिक तपासाच्या आधारे पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत.

# मुलुंडमध्ये दोन लाखांहून अधिक किमतीच्या दागिन्यांची चोरी

■ होम टाइम्स टीम

मुलुंड पूर्वेकडील नागराज सोसायटीमध्ये दोन लाखांहून अधिक रुपयांची चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. नवघर पोलिसांनी याबाबत गुन्हा दाखल करून घेतला पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत.

**नवघर पोलिसांकडून आरोपीचा शोध सुरू**

नवघर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे मुलुंड पूर्व येथील नागराज सहकारी गृहनिर्माण संस्थेतील रहिवासी आहेत. काही दिवसांपूर्वी त्यांना त्यांच्या घरी फर्निचरचे काम करायचे होते. त्यासाठी तक्रारदाराने प्रदीप विश्वकर्मा नामक व्यक्तीला घरातील फर्निचरचे काम दिले होते. २१ सप्टेंबर रोजी तक्रारदार सत्यनारायणाच्या पूजेसाठी नातेवाईकाच्या घरी जाण्यापूर्वी घरात ठेवलेल्या लोखंडी तिजोरीचा दरवाजा उघडला असता तिजोरीत ठेवलेले दागिने गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यात सोन्याची साखळी, मंगळसूत्र, सोन्याचा हार आणि सोन्याचा रॉयल नेकलेस होता. या दागिन्यांची एकूण किंमत २ लाख ९ हजार ५७० रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर त्यांनी नवघर पोलीस ठाण्यात जाऊन घटनेची माहिती दिली आणि गुन्हा दाखल केला. नवघर पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपींचा शोध घेण्याचे काम सुरू केले आहे.

# घर देण्याच्या नावाखाली मुलुंड मधील महिलेची ६५ लाखांची फसवणूक

■ होम टाइम्स टीम

विक्रोळी येथे राहणाऱ्या एका महिलेची ६५ लाखांची फसवणूक झाल्याची घटना घडली आहे. बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी घर देण्याच्या नावाखाली ही फसवणूक करण्यात आली. या प्रकरणी नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नवघर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ४९ वर्षीय वनिता कमळे या विक्रोळी पूर्व येथील रहिवासी आहेत. २०१३ मध्ये त्यांची राजेंद्र पाध्ये आणि रेखा राजेंद्र पाध्ये यांच्याशी ओळख झाली. वनिता या नव्या घराच्या शोधात असल्याची माहिती पाध्ये यांना समजली होती. त्यामुळे राजेंद्र आणि रेखा यांनी दुर्गा डेव्हलपर्सचे संचालक म्हणून वनिता यांना मुलुंड पूर्व येथील सिद्धिविनायक सहकारी गृहनिर्माण सोसायटी गुंतवणूक करण्यास सांगितले. दोघांचे म्हणणे ऐकूण वनिता यांनी या सोसायटीत घर घेण्याचा विचार केला. त्यानंतर २०१३ ते २०१९ या कालावधीत वनिता यांनी राजेंद्र व रेखा यांना वेगवेगळ्या हप्त्यांमध्ये पैसे दिले. मात्र या पैशाच्या बदल्यात त्यांना घर देण्यात आले नाही. याबाबत त्यांनी राजेंद्र व रेखा यांच्याशी चर्चा केली असता, दोघांनीही त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले. ६५ लाख रुपये दिल्यानंतरही वनिता यांना घर न मिळाल्याने त्यांनी नवघर स्थलांतरित झाले. पोलीस ठाण्यात गेल्यानंतर घटनेची माहिती मिळाली. नवघर पोलिसांनी भादंवि कलम ३४ आणि ४२० अन्वये गुन्हा दाखल केला असून राजेंद्र आणि रेखा यांची अधिक चौकशी सुरू आहे.

# पार्सलमध्ये ड्रग्ज असल्याचे सांगून महिलेला घातला एक लाखांहून अधिकचा गंडा

■ होम टाइम्स टीम

अमली पदार्थांनी भरलेले पार्सल परदेशात पाठवण्याचा खोटा आरोप करून मुलुंड येथील एका महिलेची लाखो रुपयांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. याबाबत महिलेने फसवणूक करणाऱ्या विरोधात नवघर पोलिसात गुन्हा दाखल केला आहे.

नवघर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मैथिली कापरे ही मुलुंड पूर्वेकडील गव्हाण पाडा येथील रहिवासी आहे. २० सप्टेंबर रोजी तिला एका अनोळखी क्रमांकावरून फोन आला होता. अर्णव सिन्हा नावाच्या व्यक्तीने तिला सांगितले की, आपण फेडेक्स कंपनीचे कस्टमर केअर अधिकारी असून तुम्ही मुंबईहून तैवानला पाठवलेल्या पार्सलमध्ये ड्रग्ज आढळल्याने ते परत करण्यात आले आहे, असे सांगितले. त्यावर त्या महिलेने अर्णवला आपण असे कोणतेही पार्सल पाठवले नसल्याचे सांगितले. मात्र, हे पार्सल तक्रारदाराच्या आधार कार्ड आणि ईमेल आयडीवरून पाठवण्यात आल्याचे अर्णवने सांगून याबाबत आपण संबंधित अधिकाऱ्याला माहिती द्या असे सांगितले व अर्णव नावाच्या व्यक्तीने दुसऱ्या क्रमांकावर कॉल ट्रान्सफर केला. त्या कॉल वर एका अज्ञात व्यक्तीने तिला सांगितले की, तो गुन्हे शाखेचा अधिकारी आहे. या प्रकरणी सीबीआयसारख्या विविध केंद्रीय एजन्सीने बनावट कागदपत्रे दाखवून ड्रग्जची तस्करी झाल्याचे उघड झाले असल्याचे तिला सांगितले. त्यामुळे सदर महिला घाबरलेली असल्याचे समजून त्या बोगस अधिकाऱ्याने हे प्रकरण बंद करण्यासाठी ४५ हजार रुपयांची मागणी केली. त्यामुळे भीतीपोटी तिने कोणताही विचार न करता मागितलेली रक्कम दिली. त्यानंतर तिच्याकडून ७२ हजार रुपयांची मागणी करण्यात आली. तिने तेही पैसेही दिले. त्यानंतर तिने ही माहिती पतीला सांगितल्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे तिच्या लक्षात आल्याने तिने थेट नवघर पोलीस ठाण्यात जाऊन घटनेची माहिती दिली. सध्या नवघर पोलिसांनी आयटी क्ट आणि आयपीसी कलम ४२० अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

Helpline

सिटीजन रिपोर्टर
78956 78956

होम केबल
022 - 6614 6060

होम नेट
022 - 6621 1333
customerservice@homenet.net

होम टाइम्स
022 - 6614 6050
write2us@hometimes.in

होम टाइम्स आणि होम केबलवर जाहिरात द्या
78957 78957
homecableads@gmail.com

योग्य माहितीसाठी कृपया संबंधित नंबरांवरच संपर्क करा

जाहिरातींबाबत महत्त्वाची सूचना

साप्ताहिक होम टाइम्समधून जाहिरातदारांच्या विविध प्रकारच्या जाहिराती प्रकाशित केल्या जातात. या जाहिरातीतील मजकुराबाबत सर्वस्वी जबाबदारी जाहिरातदारांची असून त्याबाबत उद्‌भवणाऱ्या कायदेशीर वा अन्य प्रकरणात साप्ताहिक होम टाइम्सचे व्यवस्थापन, मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक यांच्यासह कोणीही जबाबदार असणार नाही. याची संबंधितांनी नोंद घ्यावी. – मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक



आरोग्य आशा
डॉ. मोनिषा रावत

# 'सुजोक'

# ऑस्टियोपोरोसिस-रजोनिवृत्ती दरम्यान

औषधांशिवाय प्रतिबंध आणि उपचार, नैसर्गिकरित्या–२

जागतिक आरोग्य संघटना (डबल्यूएचओ)च्या ताज्या अहवालानुसार, ऑस्टिओपोरोसिस हा जगातील दुसरा सर्वात जास्त प्रभावित होणारा आजार आहे.





***ऑ**स्टियोपोरोसिस ही महिलांसाठी रजोनिवृत्तीमध्ये संभाव्यत: लक्षणीय समस्या आहे. संशोधन अभ्यास दर्शविते की रजोनिवृत्ती दरम्यान हाडांची निर्मिती वेगाने कमी होते, ज्यामुळे ऑस्टियोपोरोसिसचा धोका वाढतो.*

### ऑस्टियोपोरोसिस आणि रजोनिवृत्ती

*ऑस्टियोपोरोसिसला पोकळ किंवा सच्छिद्र हाडांचा रोग देखील म्हणतात. ज्यामध्ये हाडांची ताकद आणि घनता कमी होते, ज्यामुळे हाडे सहजपणे तुटण्याचा किंवा तुटण्याचा धोका वाढतो. महिलांमध्ये इस्ट्रोजेनची पातळी निरोगी हाडे राखण्यास मदत करते. परंतु रजोनिवृत्तीच्या काळात, इस्ट्रोजेनची पातळी कमी झाल्यामुळे, हाडे कमकुवत होऊ लागतात. ज्यामुळे ते छिद्रपूर्ण आणि कमकुवत (पोकळ)*




*होतात. रजोनिवृत्तीनंतर, दोनपैकी एक महिला ऑस्टियोपोरोसिसने ग्रस्त असते आणि बऱ्याच स्त्रियांना त्यांच्या आयुष्यात हाड फ्रॅक्चर होते.*

### लक्षणे :–

- *मान किंवा पाठदुखी*
- *झुकलेली मुद्रा*
- *कालांतराने उंची कमी होणे*
- *कमकुवत आणि ठिसूळ नखे*
- *किंचित हालचाल झाल्यास किंवा पडल्यामुळे फ्रॅक्चर*
- *रेसीडिंग गम लाइन*

*आमच्या 'मोनिशाज मंत्रा' मध्ये आम्ही अनेक स्त्रियांना रजोनिवृत्तीच्या काळात त्यांच्या हाडांचे आरोग्य राखण्यास आणि त्यांच्या ऑस्टिओपोरोसिसवर, कोणत्याही औषधाशिवाय आणि कोणत्याही दुष्परिणामांशिवाय, खालील मार्गांनी मदत केली आहे.*

- *सूर्यप्रकाशाचा नियमित संपर्क हा ऑस्टिओपोरोसिस रोखण्याचा आणि त्यावर उपचार करण्याचा एक उत्तम मार्ग आहे कारण सूर्यप्रकाश हा व्हिटॅमिन डीचा नैसर्गिक स्रोत आहे. जो शरीराला हाडांच्या आरोग्यासाठी आवश्यक असलेले कॅल्शियम शोषण्यास मदत करतो.*
- *फळे, हिरव्या पालेभाज्या, शेंगदाणे, बिया आणि शेब, बाजरी यांसह संतुलित पौष्टिक आहार घेणे.*
- *नियमितपणे योगाभ्यास करणे– प्राणायाम आणि स्मित ध्यान.*

## सुजोक थेरपी




- *दिवसातून दोनदा २५–३० वेळा हाताच्या सर्व १० बोटांवर सुजोक रिंग वर आणि खाली हलवा. (चित्र १ प्रमाणे)*

- *हातावर किडनी–संबंधित बिंदूंना बोटांनी किंवा डायग्नोस्टिक प्रोबने दिवसातून चार वेळा एक मिनिट मसाज करणे. (चित्र २ प्रमाणे)*




**आंतरराष्ट्रीय सुजोक असोसिएशन (ISA) प्रमाणित कार्यशाळेचे वेळापत्रक :**

१. **ऑनलाइन–सुजोक** Six Ki-1 (Level-III) ११ ते २३/१०/२०२३, २. **निवासी, मेरिडियन सुजोक** Ki (Level-II) २७ ते २९/१०/२०२३

•Limited Seats Registration on First Cum First Basis.

**Dr.Monisha Rawat - Founder of 'Monisha's Mantra', Mumbai and Global We Care Foundation -**
M.Sc., M.D. (Alternative Medicine), Life Coach, Master in Sujok, Consulting Nutritionist, Corporate Trainer, Holistic Counselor, Sujok Diabetes Specialist, International Lecturer for Sujok & Smile Taiji. ISA Authorized Lecturer for SUJOK Level - I, II, III & IV Award Winner as a BEST PERFORMING TEACHER by International Sujok Association (ISA) – SIC 2019 • National Excellence Health Award - 2019 During COVID-19 • Award winner of International Women Excellence Empowerment Award (WEE) – 2020 as a RISING STAR • Award winner of India Best Therapist Award for the Year 2021 by MKSS • Award Winner of ET CHANGE MAKER-2022 for Health & Wellness powered by Economic Times-Ascent & Navbharat Times
Award winner of PILLAR OF MAHARSHTRA AWARD-2022, in Association with MahaSEWA.
**An ISO Certified Centre at Mumbai Mulund- +91 8655139777/ 9029960086, Goregaon - +91 8433947592 / 9820343592**



सुनिता देसाई

# आरोग्य आणि मनोरंजन

## टॅरो कार्ड वाचन भविष्य आणि सल्ला

### ३० सप्टेंबर २०२३ ते ६ ऑक्टोबर २०२३

*सुनिता देसाई २००३ पासून टॅरो रिडींग करतात. ग्रँड मास्टर इन रेकी, फोर लेव्हल्स इन चक्रा मेडिटेशन, मास्टर्स इन मरमा, जीपी इन शियात्सू, क्रिस्टल अँन्ड पिरॅमिड एक्स्पर्टस, मास्टर्स इन अ‍ॅक्युप्रेशरीस्ट, अरोमा थेरपिस्ट, प्रानीक हिलर, औरा हिलर आणि व्हर्च्यू पर्सनॅलिटी डेव्हलपमेंटवर दोन पुस्तके लिहिली आहेत. जे गुजराती माध्यमिक शाळेत शिकवले जाते.*
*संपर्क : ९३२३४३०३५५ e-mail : desaisunita02@gmail.com*




■ **मेष** (अ, ल, इ)
वित्तविषयक निर्णय घेऊ शकणार नाही. आजूबाजूला असलेल्या अनेक कल्पनांमुळे गोंधळून जाल. **सल्ला:** ध्यान मदत करेल. श्वासावर लक्ष केंद्रित करा. जास्त बोलू नका आणि काही काळ एकटे राहण्याचा प्रयत्न करा. तुमच्या शिल्लककडे लक्ष द्या.




■ **कर्क** (ड, च, ह)
तुम्ही जे प्रयत्न कराल ते तुम्हाला मिळेल. कोणीतरी तुमची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करेल. **सल्ला:** जे लोक खूप गोड बोलतात त्यांच्यावर विश्वास ठेवू नका. समाधान तुम्हाला अधिक मिळवण्यास मदत करेल. तुमच्या ज्ञानाकडे लक्ष द्या.




■ **तुळ** (र, ट)
तुम्ही तुमचा मार्ग बदलाल आणि नवीन गोष्टी आणि यश सहज मिळेल. **सल्ला:** या आठवड्यात बाहेरचे अन्न खाऊ नका. तपकिरी रंगाच्या गोष्टी वापरा. आपल्या सामर्थ्याकडे लक्ष द्या.




■ **मकर** (ख, ज)
तुम्ही स्वत:ला अनेक बाबतीत सामर्थ्यवान समजाल आणि लोक तुम्हाला साथ देतील. **सल्ला:** तुमचे जुने कपडे गरजू लोकांना दान करा. गुलाबी रंगाच्या वस्तू वापरा. तुमच्या लक्ष्याकडे लक्ष द्या.




■ **वृषभ** (ब, व, य)
सकारात्मक विचार कराल परंतु कृती करताना तुमची मत्सर तुम्हाला त्रास देईल. **सल्ला:** तुमच्या मानसिक अडथळ्यांपासून मुक्त होण्याचा प्रयत्न करा. तुमच्या आजूबाजूच्या लोकांना नि:स्वार्थपणे मदत करा. तुमच्या स्वाभिमानाकडे लक्ष द्या.




■ **सिंह** (म, ट)
तुम्हाला लोकांवर आणि तुमच्या स्वत:च्या भावनांवर नियंत्रण ठेवण्याची शक्ती मिळेल. **सल्ला:** नवीन लोकांशी जास्त बोलू नका. निळ्या रंगाच्या गोष्टी वापरा. तुमच्या भावनांकडे लक्ष द्या.




■ **वृश्चिक** (न, य)
तुम्हाला काही रहस्ये कळतील आणि तुम्ही निर्णय घेण्यास सक्षम असाल **सल्ला:** काही गरजू व्यक्तींना धान्य दान करा. राखाडी रंगाच्या गोष्टी वापरा. तुमच्या रागाकडे लक्ष द्या.




■ **कुंभ** (ग, स, श)
तुम्ही बऱ्याच वेळा गोंधळून जाल, यश आहे पण काही अतिरिक्त दबाव आहे. **सल्ला:** काही नवीन करण्यापूर्वी दोनदा विचार करा. लाल रंगाच्या गोष्टी वापरा. तुमच्या प्रेमाकडे आणि काळजीकडे लक्ष द्या.




■ **मिथुन** (क, च, ज)
तुम्हाला तुमच्या कामात समाधान मिळेल आणि तुमच्या प्रयत्नांचे चांगले फळ मिळेल. **सल्ला:** तुमचा वेळ आणि शक्ती वाया घालवू नका. तुम्हाला भेटणाऱ्या लोकांना सुखसोयी देण्याचा प्रयत्न करा. तुमच्या बदलांकडे लक्ष द्या.




■ **कन्या** (प, ठ, ण)
तुम्ही या आठवड्यात गोंधळात राहाल कारण गोष्ट खूप वेगाने बदलेल. **सल्ला:** ज्या लोकांचा तुम्ही आदर कराल त्यांच्या आज्ञा पाळा. जांभळ्या रंगाच्या वस्तू वापरा. तुमच्या भावनांकडे लक्ष द्या.




■ **धनु** (भ, ड, फ, ट)
या आठवड्यात पैशात काही सुधारणा होईल आणि तुमचा दृष्टीकोन तुम्हाला मदत करेल. **सल्ला:** जेव्हा तुमच्या भावना नकारात्मक असतात तेव्हा त्यावर नियंत्रण ठेवा. वस्तू पिवळ्या रंगात वापरा. तुमच्या कामाकडे लक्ष द्या.




■ **मीन** (द, च, झ)
मन:शांती आणि समाधान मिळविण्यासाठी तुम्हाला काही चांगले मार्ग सापडतील. **सल्ला:** वाद टाळा आणि लोकांची मते जाणून घेण्याचा प्रयत्न करा. गडद निळ्या रंगाच्या गोष्टी वापरा. तुमच्या विश्वासाकडे लक्ष द्या.

# महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी ३३ वर्षीय रेल्वे कर्मचाऱ्याला अटक

■ **होम टाइम्स टीम**

२३ वर्षीय महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी एका ३३ वर्षीय रेल्वे कर्मचाऱ्याला नवघर पोलिसांनी अटक केली आहे. सध्या या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

नवघर पोलिसांनी एका ३३ वर्षीय रेल्वे कर्मचाऱ्याला २३ वर्षीय महिलेचा पाठलाग करून विनयभंग केल्याप्रकरणी अटक केली आहे. सागर सुरेंद्र जैस्वाल असे आरोपीचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पिडीत आणि आरोपीसोबतचे संबंध होते. मात्र ते सबंध सुरू ठेवण्यास तिने नकार दिला होता. २०२१ मध्ये मध्य रेल्वेमध्ये अप्रेंटेशिप म्हणून काम करत असताना माटुंगा रेल्वे वर्कशॉपमध्ये दोघांची भेट झाली. त्यानंतर दोघांची ओळख झाली, त्यातून त्यांचे संबंध सुरू झाले. आरोपीने स्वतःला अविवाहित असल्याचे सांगितले होते. त्यानंतर पीडित महिलेने त्यांचे नाते पुढे नेण्यास नकार दिल्याने आरोपीने तिची छेड काढण्यास सुरुवात केली. आरोपीला नवघर पोलिसांनी ताब्यात घेतले असून, या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

# अल्पवयीन मुलीवर दोघांचा सामूहिक बलात्कार

■ **होम टाइम्स टीम**

मुलुंड येथे सामूहिक बलात्काराचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. एका १६ वर्षीय मुलीवर काही नराधमांनी सामुहिक बलात्कार केला. चाकूचा धाक दाखवून आणि आईला जिवे मारण्याची धमकी देऊन त्यांनी हे संतापजनक कृत्य केले. पिडीत मुलगी अल्पवयीन आहे. या घटनेमुळे मुलुंडमध्ये खळबळ उडाली असून या प्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. तर अन्य आरोपीचा पोलीस शोध घेत आहेत

पोलिसांनी या प्रकरणी भारतीय दंड विधान संहिता कलम आणि पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. नुकतीच जोगेश्वरी मध्ये देखील आठ वर्षाच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली होती. त्यानंतर मुलुंडमध्ये ही घटना घडल्याने मुलुंडमध्ये संतापाचे वातावरण पसरले आहे. एका आरोपीला मुलुंड मधून गजाआड केल्यानंतर दुसऱ्या आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांचे पथक परराज्यात गेले असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे. अटक केलेल्या आरोपीचे नाव निलेश पुवन हरिजन असे असून पाहिजे असलेल्या आरोपीचे नाव नटराज नटराज नटराजन हरिजन असे असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे.

# चोराने ६० हजाराच्या मोबाईलची केली चोरी

■ **होम टाइम्स टीम**

काही दिवसांपूर्वी मुलुंड पोलिसांनी चोरी झालेल्या, हरवलेल्या मोबाईलचा तपास करून त्यांची रिकव्हरी करत ते नागरिकांना परत केले होते. त्यावेळी पोलिसांकडून नागरीकांना मोबाईल चोरांवर अंकुश बसविण्यासाठी कोणती काळजी घ्यावी याची माहिती दिली होती. परंतु याच आठवड्यात मुलुंड मध्ये पुन्हा एकदा मोबाईल चोर सक्रिय झाल्याचे दिसून आले आहे.

मुलुंडच्या निर्मल लाईफ स्टाईल परिसरात एका इसमाच्या खिशातून ६० हजाराचा मोबाईल चोरी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. राजेश ढिकले हे निर्मल लाईफस्टाईल परिसरात एका आस्थापनेमध्ये कायदेशीर सल्लागार आहेत. ते त्यांचे काम आटोपून सोमवारी संध्याकाळी ४:००च्या सुमारास घरी परतण्यासाठी मुलुंड स्टेशनला जाणारी ४९६ क्रमांकाची बस पकडत होते. त्यावेळी अचानक त्यांच्या खिशातून सॅमसंग नोट ट्रेंटी हा मोबाईल चोरी केला. राजेंद्र यांना हे समजतात त्यांनी त्यांच्या मित्राला या क्रमांकावर कॉल करायला सांगितला. परंतु त्यांचा फोन स्वीच ऑफ होता. या संदर्भात त्यांनी मुलुंड पोलीस ठाण्यामध्ये मोबाईल चोरीची तक्रार दाखल केली आहे. पोलिसांकडून मोबाईल चोराचा शोध घेतला जात आहे.



जसराज ॲन्टिक ®

सरोज गड़ा (मुलुंड-पूर्व) (राईधणजर/गडशीशा)

सणासाठी विशेष ऑफर

10% to 40% डिसकाउंट

१ ग्रॅम सोन्याच्या दागिन्यांमध्ये अनेक नवीन डिझाईन्स उपलब्ध

नेत्रदीपक आणि आकर्षक डिझाईन जे मूळ दागिन्यांनाही फिके पाडेल + कुंदन + नेकलेस सेट
पेंटेड ब्युटी लॉंग सेट + चंदनहार + दागिने + जवपतला गोल्ड + रोडियम ब्रेसलेट + चेन
आणि अनेक प्रकारचे आलिशान आणि आकर्षक दागिने

जुन्या आणि नवीन सर्व ग्राहकांचे स्वागत आहे

नागरिकांचा विश्वास म्हणजे जसराज ॲंटिकची खास ऑफर

सणाच्या ऑफरवर १०% ते ४०% सूट

Note: Before coming pl buzz on Cell.

CONTACT : GIRISH GADA - 9821376756 SAROJ GADA - 9821854370

CALL CENTER
**022 66211333**

E-MAIL ID
**customerservice@homenet.net**

FACEBOOK MESSENGER
**HomeNet / @homenet.net**

**Facebook Messenger Scan Code:**
To get in touch, simply scan a code using the Messenger app.

**HOME NET**
**www.homenet.net**

WOW!
Pay For 6 Months & Get Additional 7 Months Free

**DOUBLE MAZZA!!**
uploads & downloads at same speed, since 2010
now @ ₹194/-*

67 OFFER

## TRULY UNLIMITED SPEED PLANS

| PLAN NAME | 30 DAYS RATE | | 390 DAYS |
|---|---|---|---|
| 20 Mbps Unlimited | 500/- | NOW 231/-* | 3000/- |
| 30 Mbps Unlimited | 600/- | NOW 276/-* | 3600/- |
| 40 Mbps Unlimited | 720/- | NOW 332/-* | 4320/- |
| 50 Mbps Unlimited | 850/- | NOW 392/-* | 5100/- |
| 60 Mbps Unlimited | 985/- | NOW 455/-* | 5910/- |

## UNLIMITED POWER PLANS

| PLAN NAME | DATA(GB) | SPEED AFTER DC | 30 DAYS RATE | | 390 DAYS |
|---|---|---|---|---|---|
| 40 Mbps till Allotted Data | 250 | 20 Mbps | 600/- | NOW 277/-* | 3600/- |
| 60 Mbps till Allotted Data | 500 | 30 Mbps | 750/- | NOW 346/-* | 4500/- |

UPLOAD OR DOWNLOAD @SAME SPEED
99% UPTIME

- Affordable Rates
- Super speed Upto 100 mbps
- Customer support Android / IOS app
- Online Payments
- Customer care 9 am - 12 midnight

PE 67 OFFER

## NEWLY LAUNCHED - FIBER TO THE HOME TECHNOLOGY

**HOME FIBER**
powered by HomeNet

UNLOCK YOUR SUPERPOWER

## INTRODUCTORY HOME FIBER PACKS

UPGRADE YOUR EXISTING HOME NET TO
NEW FIBERNET EXPERIENCE WITH
ZERO INSTALLATION COST**
For New Customers installation charges of Rs.500/-* applicable

## HOME FIBER TRULY UNLIMITED SPEED PACKS

| PACK NAME | DATA(GB) | SPEED AFTER DC | EFFECTIVE MONTHLY RATE | 360 DAYS |
|---|---|---|---|---|
| 35 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 337/-* | 4040/- |
| 50 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 421/-* | 5050/- |
| 75 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 505/-* | 6060/- |
| 100 Mbps HomeFiber | UNLIMITED | NA | NOW 589/-* | 7070/- |

Many more Speed Pack options available up to 500 Mbps

** offer available only at the FTTH G / EPON Ready Building

TO AVAIL THIS
INTRODUCTORY OFFER
IN YOUR SOCIETY
PLEASE COME TO US WITH
A MINIMUM GROUP OF
15 CONNECTIONS

SYMMETRIC SPEED
SUPER SPEED PACK UP TO 500MBPS
EASY LOCAL APPROACH FOR ISSUE RESOLUTION
FASTER VISITS FOR TECHNICAL SOLUTIONS
NO VISIT CHARGES FOR ISSUES & COMPLAINTS

Customer Portal **login.homenet.net**
Customer Service Mobile App **Log2Space - HomeNet**
Download on the App Store
GET IT ON Google Play

FOR NEW CONNECTIONS OR QUERIES CALL
**Call - 75067 96562, 88790 00724, 88790 00720, 88794 47839**
**MULUND** - A / 16, Gaurav Annex, R.R.T Road, Mulund (W), Mumbai - 400 080. Tel.: 022 662 11 333

MALAD • COLABA • VASHI • NERUL • THANE • AIROLI • ASANGAON • VASIND

*conditions apply

Printer , Publisher & Owner : **Hemanshu Girish Kothari** & Printed at Dangat Media Pvt. Ltd, Plot No.22, Digha MIDC, Vishnu Nagar, TTC Industrial Area, Digha, Navi Mumbai. Published at G/4, Landmark Appartment, Devidayal Cross Road, Mulund (W), Mumbai - 80.**Home Times** (Office): - 6th Floor, Flora Point, S.N. Road, Near Mulund Court, Mulund (W), Mumbai-80. **Editor : Hemanshu Girish Kothari** ● **RNI No.: MAHMAR/2016/66872**